# प्रेस नोट

सन २०१७-१८ या शैक्षिणक वर्षासाठी समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद लातूर यांचे मार्फत लातूर जिल्हयातील सर्व जिल्हा परिषद शाळा, अनुदानित, विनाअनुदानित खाजगी प्राथमिक /माध्यमिक/शासकीय निवासी शाळेतील ईयत्ता ५ वी ते १० वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय मुला व मुलीकरिता राबविल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांचे प्रस्ताव पुढील प्रमाणे १.प्रत्येक तालूकानिहाय कॅम्पमध्ये दाखल करण्यात यावेत २. ऑनलाईन अर्ज भरून समाज कल्याण कार्यालयात दाखल करावेत ३. तालुकास्तरीय समितीकडे दाखल करावेत असे आवाहन जिल्हा परिषदेचे समाजकल्याण सभापती मा. श्री संजय सिताराम दोरवे व जिल्हा समाज कल्याण अधिकारी मा. श्री संतोषकुमार नाईकवाडी यांनी केलेली आहे.

**कॅम्पमध्ये दाखल करावयाचे प्रस्ताव :-**

१. एस.एस.सी. परिक्षा फी.प्रस्ताव

२. गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रस्ताव इ.५ वी ते ७ वी व इ.८वी ते १० वी

३. आस्थीव्यंग, मुकबधीर, अंध या प्रवर्गातील शारीरिक दृष्टया अपंग असणाऱ्या विद्यार्थ्यांना
   १) शालांतपूर्व अपंग शिष्यवृत्ती (इ.१ ली ते १० वी २) मॅटीकोत्तर अपंग शिष्यवृत्ती
   ( इ. ११ वी पासून पुढील सर्व प्रकारचे शिक्षण अभ्यासक्रम) :-
   सदर अपंग शिष्यवृत्ती प्रस्तावासोबत शाळा/महाविद्यालयाचे पत्र,अपंगत्वाचे किमान ४०% त्रिसदस्यी समितीचे वैद्यकीय प्रमाणपत्र, बँक पासबुकचे झेरॉक्स प्रत (IFSC कोड आवश्यक),मागिल वर्षाचे गुणपत्रक, महाविद्यालयीन विद्यार्थ्याने शुल्क भरलेल्या शुल्कांच्या पावत्या, मागील वर्षाची शिष्यवृत्ती वाटप पावत्या इ.अवश्यक कागदपत्रे सोबत जोडावेत.

४. खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शाळामध्ये इ. १ ली ते १० वी मध्ये शिकत असलेल्या मागासवर्गीय दारिद्रय रेषेखाली (BPL)कुंटूबातील अनु.जाती, वि.जा.भ.ज. व वि.मा.प्र.प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क प्रतिपूर्ती प्रदाने.

**ऑनलाईन अर्ज भरून समाज कल्याण कार्यालयात दाखल करावयाचे प्रस्ताव :-**

५. इ.९ वी व १० वी मध्ये शिकणाऱ्या अनु.जातीच्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकपूर्व भारत सरकार शिष्यवृत्ती ऑनलाईन भरुन त्याची हार्डकॉपी कागदपत्रासह कार्यालयात सादर करणे.

६. इ.५वी ते ७वी मधील अनु.जाती व विजाभजच्या वर्गातील मुली आणि इ.८वी ते १० वी मधील अनु.जाती , विजाभज व विमाप्र प्रवर्गातील मुलीसाठी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्तीचे अर्ज हे ऑनलाईन भरण्यात यावेत व त्याची हार्डकॉपी कागदपत्रासह कार्यालयात सादर करणे. अर्जाचा नमूना https:// mahaeschol. maharashtra. gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेला आहे.

**तालुकास्तरीय समितीकडे दाखल करावयाचे प्रस्ताव :-**

७. अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती इ. १ ली ते १० वी चे प्रस्ताव गटशिक्षणाधिकारी पं.स. यांचेकडे दाखल करून तालुकास्तरीय समितीची मान्यता घ्यावी व त्यानंतर ऑनलाईन अर्ज भरून त्याची हार्डकॉपी समाज कल्याण जि.प. लातूर कार्यालयात दाखल करावी.

**सदर कॅम्पच्या तारखा खालील प्रमाणे आहेत.**

| अ.क्र. | तालूक्याचे नांव | दिनांक | कॅम्पचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | लातूर | १८/८/२०१७ | जि.प. सभागृह लातूर |
| २ | औसा | १९/८/२०१७ | पं. स. सभागृह औसा |
| ३ | निलंगा | २१/८/२०१७ | पं. स. सभागृह निलंगा |
| ४ | शिरुर अनंतपाळ | २२/८/२०१७ | पं. स. सभागृह शिरुर अनंतपाळ |
| ५ | देवणी | २३/८/२०१७ | पं. स. सभागृह देवणी |
| ६ | उदगीर | २४/८/२०१७ | पं. स. सभागृह उदगीर |
| ७ | जळकोट | २८/८/२०१७ | पं. स. सभागृह जळकोट |
| ८ | अहमदपूर | २९/८/२०१७ | पं. स. सभागृह अहमदपूर |
| ९ | चाकूर | ३१/८/२०१७ | पं. स. सभागृह चाकूर |
| १० | रेणापूर | ०१/९/२०१७ | पं. स. सभागृह रेणापूर |

जिल्हा समाज कल्याण अधिकारी
जिल्हा परिषद लातूर